नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १५७ Issue - 157 | वार बुधवार दि. २३ ऑक्टोबर २०२४ Blow- Wednesday Date 23 October 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## थोरात यांची शिष्टाई कामी; मविआतील पेच संपला आणि जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: महाविकास आघाडीत जागावाटपावरुन सुरु असलेलं घमासान अखेर संपलं आहे. काँग्रेस नेतृत्त्वानं नाना पटोले यांच्या जागी बाळासाहेब थोरात यांना शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी शपचे अध्यक्ष शरद पवार यांच्याशी यशस्वी चर्चा केली. थोरात यांची शिष्टाई कामी आल्यानं महाविकास आघाडीचं जागावाटप मार्गी लागलं आहे. विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाला आहे.

मुंबई, विदर्भातील जागांवरुन महाविकास आघाडीत मोठा पेच निर्माण झाला होता. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शिवसेना उबाठाचे खासदार संजय राऊत यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. त्यावरुन वाद विकोपाला गेला. यानंतर काँग्रेस नेतृत्त्वानं पटोले यांच्या



जागी चर्चेची जबाबदारी बाळासाहेब थोरात यांच्याकडे गेली. नेमस्त असलेल्या थोरात यांनी शरद पवार, उद्धव ठाकरेंशी चर्चा करत जागावाटपाचा तिढा सोडवला आहे.

विदर्भ, मुंबईतील जागांवरुन महाविकास आघाडीत वाद होता. विदर्भातील तिढा असलेल्या जागा काँग्रेसला आणि मुंबईतील पेच असलेल्या जागा ठाकरेसेनेला असा मार्ग थोरात यांनी काढला. जागावाटपात काँग्रेसला १०३ ते १०८ जागा येण्याची शक्यता आहे. काँग्रेस जागावाटपात मोठा भाऊ असेल. ठाकरेंची शिवसेना ९० ते ९५ जागा लढवेल. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ८० ते ८५ जागा सुटतील. तर लहान पक्षांना ३ ते ६ जागा सोडण्यात येतील. शेकाप, समाजवादी पक्ष आणि आपला जागा सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबद्दलचं वृत्त एबीपी माझानं दिलं आहे.

तिन्ही पक्षांची असलेली ताकद पाहता काँग्रेस विदर्भात सर्वाधिक जागा लढणार आहे. ठाकरेंच्या शिवसेनेला मुंबई, ठाणे, कोकण, मराठवाड्यात जास्त जागा देण्यात आलेल्या आहेत. शरद पवारांची राष्ट्रवादी पश्चिम महाराष्ट्रात सर्वात जास्त जागा लढेल. याशिवाय त्यांना मराठवाड्यातही काही जागा सोडण्यात आलेल्या आहेत. विदर्भातील १२, मुंबईतील ३ आणि अन्य ३ जागांवर मविआत वाद होता. तो सोडवण्यात थोरात यांना यश आलं आहे.

जागावाटपाच्या चर्चेत संजय राऊत यांच्यासोबत नाना पटोलेंची झालेलं शाब्दिक युद्ध पाहता काँग्रेस नेतृत्त्वानं समन्वयाची जबाबदारी थोरात यांच्याकडे दिली. 'काँग्रेस संस्कृती'चा दांडगा अनुभव असलेल्या थोरात यांनी शरद पवार, उद्धव ठाकरेंची भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. थोरात यांची शिष्टाई कामी आली. त्यांनी वाद मिटवण्यात यश मिळवलं. त्यामुळे मविआतील पेच संपला आणि जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाला.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी जाहीर केली शिवसेनेच्या उमेदवारांची पहिली यादी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाने विधानसभा निवडणुकीसाठीची यादी जाहीर केली आहे. या यादीत एकूण ४५ नावं आहेत. ही विधासभा निवडणुकीसाठीची पहिली यादी आहे. दादा भुसे, गुलाबराव पाटील यांच्यासह स्वतःचीही उमेदवारी एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली आहे आणि सगळ्या उमेदवारांना शुभेच्छा दिल्या आहेत. महायुतीच्या जागावाटपाचं काम जवळपास होत आलं आहे आणि लवकरच तुम्हाला त्याची माहिती दिली जाईल असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवसांपूर्वी म्हटलं होतं. त्यानंतर भाजपाने ९९ जागांची यादी जाहीर केली. तर आता एकनाथ शिंदे यांनी शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाची ४५ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

यादीत कुणाची नावं आहेत?

एकनाथ शिंदे, कोपरी पाचपाखाडी., मंजुळाताई गावित,साक्री., चंद्रकांत सोनवणे,चोपडा., गुलाबराव पाटील, जळगाव ग्रामीण., अमोल पाटील, एरंडोल., किशोर पाटील, पाचोरा., चंद्राकांत पाटील, मुक्ताईनगर., संजय गायकवाड, बुलढाणा., संजय रायमुलकर, मेहकर., अभिजित अडसूळ, दर्यापूर., आशिष जैस्वाल, रामटेक., नरेंद्र भोंडेकर, भंडारा., संजय राठोड, दिग्रस., बालाजी कल्याणकर, नांदेड उत्तर., संतोष बांगर, कळमनुरी., अर्जुन खोतकर, जालना₹लीअब्दुल सत्तार, सिल्लोड., प्रदीप जैस्वाल, छ. संभाजीनगर मध्य., संजय शिरसाट, छ. संभाजीनगर पश्चिम., विलास संदिपान भूमरे, पैठण., रमेश बोरनारे, वैजापूर., दादा भुसे, मालेगाव बाह्य., प्रताप सरनाईक, ओवळा माजीवाडा., प्रकाश सुर्वे, मागाठाणे.स, मनिषा वायकर, जोगेश्वरी पूर्व, दिलीप लांडे, चांदिवली., मंगेश कुडाळकर, कुर्ला., सदा सरवणकर, माहीम., यामिनी जाधव, भायखळा., महेंद्र थोरवे, कर्जत., महेंद्र दळवी, अलिबाग., भरतशेठ गोगावले, महाड., ज्ञानराज चौगुले, उमरगा., तानाजी सावंत, परांडा., शहाजीबापू पाटील, सांगोला., महेश शिंदे, कोरेगाव., योगेश कदम, दापोली., शंभूराज देसाई, पाटण., उदय सामंत, रत्नागिरी., किरण सामंत, राजापूर., दीपक केसरकर, सावंतवाडी., प्रकाश आबिटकर, राधानगरी., चंद्रदीप नरके, करवीर., सुहास बाबर, खानापूर

## देशभर सर्वत्र सोन्याच्या एकसमान दरासाठी प्रयत्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : रत्न व आभूषण उद्योगाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ऑल इंडिया जेम एड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिलने (जीजेसी) 'वन नेशन, वन गोल्ड रेट' अर्थात देशभरात सर्वत्र सोन्याचे एकसमान दर लागू करण्याचे प्रयत्न अंतिम टप्प्यात असल्याचे मंगळवारी स्पष्ट केले.



देशात एकाच दराने सोने आयात केले जाते, मात्र देशांतर्गत किरकोळ किमती एका शहरातून दुसऱ्या शहरात बदलतात. विविध महानगरांसह, शहरे, खेड्यांमधील विक्रेत्यांकडे सोन्याचे दर सध्या वेगवेगळे आहेत. ग्राहकांसाठी सर्वत्र एकसारखीच किंमत राहील यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे 'जीजेसी'ने स्पष्ट केले. देशभरात एकच दर हवा आहे, असे जीजेसीचे सचिव मितेश धोर्डा यांनी 'लकी लक्ष्मी' या सुधारित वार्षिक उपक्रमाच्या अनावरणप्रसंगी सांगितले. २२ ऑक्टोबर ते ९ डिसेंबर या कालावधीत हा सुवर्ण महोत्सव सुरू राहणार आहे.

जीजेसी सदस्यांसोबत यापूर्वीच पन्नासहून अधिक बैठका या संबंधाने झाल्या असून या उपक्रमासाठी ८,००० सराफांना एकत्र आणण्यात या संघटनेने यश मिळवले आहे. सरकारला यासंबंधी निवेदन दिले जाणार असून 'जीजेसी'च्या भागधारकांना याबाबत महत्त्व पटवून देण्यावर भर दिला जात आहे. जीजेसीच्या सदस्यांना व्हॉट्सप ब्रॉडकास्ट समूहाद्वारे शिफारस केलेले दर आधीच दिले जात आहेत. आमचे लक्ष्य टप्प्याटप्प्याने किमान ४ ते ५ लाख सराफांपर्यंत पोहोचण्याचे आहे, असेही धोर्डा म्हणाले. एकसमान दराची अंमलबजावणी विशेषतः गुजरातमध्ये आव्हानात्मक ठरेल, असे त्यांनी सूचित केले.

## नीलेश राणेंचा भाजपला रामराम, १९ वर्षात चौथे पक्षांतर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिंधुदुर्ग : भाजप खासदार नारायण राणे यांचे सुपुत्र आणि माजी खासदार नीलेश राणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. पत्रकार परिषद घेत राणेंनी आपला निर्णय जाहीर केला. उद्या ते शिवसेनेचा झेंडा हाती घेतील. जागावाटपात कुडाळ विधानसभा मतदारसंघ शिवसेनेकडे गेला असून नीलेश राणे तेथून निवडणूक लढवणार आहेत.

१९ वर्षांनी नीलेश राणे स्वगृही परतले. शिवसेनेतून राजकीय कारकीर्द सुरु करणाऱ्या नीलेश राणेंचे चौथे पक्षांतर मानावे लागेल. शिवसेना सोडल्यानंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. तिथून खासदारकीही मिळवली. त्यानंतर त्यांनी वडील नारायण राणेंनी काढलेल्या महाराष्ट्र स्वाभिमान पक्षात प्रवेश केला. पुढे राणेंनी हा पक्ष भाजपात विलीन केला. त्यामुळे नीलेशही पर्यायाने भाजप सदस्य झाले. आता ते पुन्हा शिवसेनेत येत आहेत.

विशेष म्हणजे ही राजकीय तडजोड असली, तरी पिता भाजप खासदार, बंधू नितेश राणे आमदार आणि भाजप उमेदवार असून नीलेश आता शिवसेना उमेदवार असतील. म्हणजेच एकाच घरात आता दोन पक्षांचे सदस्य असतील. कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांसह भाजपमध्ये आलो. इथे खूप आदर मिळाला, सर्व नेत्यांनी प्रेम दिलं. भाजपची शिस्त शिकायला मिळाली. देवेंद्र फडणवीसांनी लहान भावासारखं सांभाळलं. अध्येमध्ये अडचणी आल्या, पण त्यातून बाहेर काढलं, पक्षात स्थान दिलं. रवींद्र चव्हाणांनी भावासारखं सांभाळलं. उद्या शिवसेनेत प्रवेश नक्की झाला आहे. युतीत असताना नियमांनी काम करावं लागतं. लोकसभेला कुडाळ विधानसभा मतदारसंघात २७ हजारांची लीड घेतली होती. ९० टक्के ग्रामपंचायती, बाजार समिती, कृषी सोसायटी जिंकल्या, सिंधुदुर्गची खासदारकीही जिंकलो, विधानसभाही जिंकणार, असा विश्वास नीलेश राणेंनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

बाळासाहेबांवर प्रेम आहेच. ते कायमच दैवतच आहेत. काँग्रेसमध्ये असतानाही प्रेम होतं. काही राजकीय निर्णय घ्यावे लागतात. निवडणूक जिंकणं हेच आमचं लक्ष्य असतं. माझी स्पर्धा कुठल्या आमदाराशी नाही, माझ्या स्वतःशी आहे. मतदारसंघाचं चागलं करणं हे माझं लक्ष्य आहे. दहा वर्षात कुडाळ मतदारसंघ स्वतःची ओळख विसरला, ती परत मिळवून देणार आहे. २१ व्या शतकातील मतदारसंघ वाटला पाहिजे. माझ्या घरात अनेक वर्ष लाल दिवा होता. पण पक्षाला माझी जशी गरज, तसं मी काम करणार, असं नीलेश म्हणाले.

## १०० कोटी खंडणी प्रकरणात सचिन वाझेला जामीन मंजूर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाविकास आघाडी सरकारच्या काळात गाजलेल्या १०० कोटी रुपयांच्या खंडणी प्रकरणात महत्त्वाची अपडेट आहे. तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप करणारा बडतर्फ पोलीस अधिकारी सचिन वाझेला जामीन मंजूर झालेला आहे. मुंबई उच्च न्यायालयानं वाझेला जामीन दिला आहे.

१०० कोटी रुपयांच्या खंडणी वसुली प्रकरणात सचिन वाझेनं मुंबई उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. 'या प्रकरणात मी माफीचा साक्षीदार बनलो आहे. शिवाय या प्रकरणातील मुख्य आरोपी अनिल देशमुख यांच्यासह सर्व आरोपींना जामीन मिळालेला आहे. त्यामुळे मलाही जामीन मिळण्याचा हक्क आहे', असं वाझेनं जामीन अर्जात नमूद केलं होतं. या अर्जावरील सुनावणी न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठानं २३ ऑगस्टला पूर्ण केली आणि निकाल राखून ठेवला होता. तो न्यायालयानं आज दिला.

अनिल देशमुख यांच्याशी संबंधित १०० कोटी रुपयांच्या खंडणी प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयानं सचिन वाझेला दिलासा दिला आहे. जामीनाच्या अटी आणि शर्ती निश्चित करण्याचे आदेश उच्च न्यायालयानं विशेष पीएमएलए न्यायालयाला दिले होते. या प्रकरणातील अन्य आरोपींना जामीन मिळाल्याचा दाखला देत वाझेनं जामीन देण्याची विनंती न्यायालयाला केली होती. पण त्याला जामीन देण्यास सक्तवसुली संचलनालयानं विरोध केला होता. पण आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर वाझेला जामीन मंजूर झाला आहे. सचिन वाझेनं ज्येष्ठ वकील आबाद पोंडा आणि रोनक नाईक यांच्यामार्फत जामिनासाठी अर्ज केला होता. अनिल देशमुखांनंतर वाझेला जामीन मिळणार का, याकडे अनेकांचं लक्ष लागलं होतं.

### खेड-शिवापूर पोलिसांची मोठी कारवाई

### पाच कोटींची रक्कम केली जप्त

## ऐन विधानसभा निवडणुकीत पोलिसांची दबंग कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यातील खेड-शिवापूर शिवारात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे सातारा रस्त्यावरील खेड-शिवापूर टोल नाक्यावर रोख रक्कम घेऊन जाणारे इनोव्हा क्रिस्टा कारला राजगड पोलिसांनी काल सोमवारी सायंकाळी ताब्यात घेतले. या वाहनात पैशांची मोठी रक्कम होती. पोलिसांनी रात्री उशिरापर्यंत पैसे मोजण्याचं काम करत होते, अशी माहिती मिळाली आहे. अंदाजे ५ कोटीच्या आसपास रोख रक्कम होती. पोलिसांनी ती ताब्यात घेतली आहे. ही वाहन कुठून आली होती याची माहिती नाही. पण वाहन सांगोला मतदारसंघात जात होती. चक २५ ड २५२६ इनोव्हा क्रिस्टा ही कार अमोल शहाजीराव नलवडे या व्यक्तीची असल्याचं माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे - सातारा रस्त्याने एका वाहनातून रोख रक्कम घेऊन जाणार असल्याची माहिती राजगड पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार राजगड पोलिसांनी सोमवारी दुपारपासून खेड-शिवापूर टोल नाक्यावर सापळा रचला होता. सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास एक संशयित वाहन टोल नाक्यावर आले. यावेळी या वाहनाची तपासणी केली असता त्यात रोख रक्कम असल्याचे दिसून आले. यावेळी पोलिसांनी संबंधित वाहन पोलिस चौकीला आणून त्यातील रोख रक्कम ताब्यात घेतली. तसेच या वाहनातील चार जणांनाही चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. सध्या खेड-शिवापूर पोलिस चौकीत वरिष्ठ पोलिस आणि महसूल अधिकारी दाखल झाले आहेत. या वाहनातील रककमेची शहानिशा करण्याचे काम सुरु आहे.





दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांनी प्रचारासाठी कंबर कसली आहे. रविवारी भारतीय जनता पक्षाने ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. आता उमेदवार राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या यादीची प्रतीक्षा करत आहेत. दरम्यान पुण्यातल्या हडपसर या विधानसभेच्या जागेवर मोठा पेच असताना चेतन तुपे यांनी थेट प्रचार सुरू केला आहे.

दरम्यान निवडणूक आयोगाने दणका देत पुण्यात प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या तीन रिक्षा जप्त केल्या आहेत. चेतन तुपे यांनीच आम्हाला प्रचार करण्यासाठी पैसे दिले असल्याची एक ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. याबाबत पोलिसांकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली.

## विधानसभेसाठी मनसेची दुसरी यादी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने विधानसभेसाठी ४५ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे.



कल्याण ग्रामीण - प्रमोद (राजू) पाटील., माहिम - अमित राज ठाकरे., भांडुप पश्चिम - शिरीष सावंत., वरळी - संदीप देशपांडे., ठाणे शहर - अविनाश जाधव,. मुरबाड - संगिता चेंजवणकर., कोथरुड - किशोर शिंदे., हडपसर - साईनाथ बाबर.। खडकवासला - मयुरेश वांजळे., मागाठाणे - नयन कदम., बोरीवली - कुणाल माईणकर., दहिसर - राजेश येरुणकर., दिंडोशी - भास्कर परब. वर्सोवा - संदेश देसाई कांदिवली पूर्व - महेश फरकासे गोरेगाव - विरेंद्र जाधव चारकोप - दिनेश साळवी जोगेश्वरी पूर्व - भालचंद्र अंबुरे विक्रोळी - विश्वजित ढोलम घाटकोपर पश्चिम - गणेश चुक्कल घाटकोपर पूर्ण - संदीप कुलथे., चेंबूर - माऊली थोरवे., चांदिवली - महेंद्र भानुशाली., मानखुर्द-शिवाजीनगर - जगदीश खांडेकर., ऐरोली - निलेश बाणखेले., बेलापूर - गजानन काळे., मुंब्रा - कळवा - सुशांत सूर्यराव., नालासोपारा - विनोद मोरे., भिवंडी पश्चिम - मनोज गुळवी., मिरा-भाईंदर - संदीप राणे., शहापूर - हरिश्चंद्र खांडवी., गुहागर - प्रमोद गांधी., कर्जत-जामखेड - रवींद्र कोठारी., आष्टी - कैलास दरेकर., गेवराई - मयुरी म्हस्के., औसा - शिवकुमार नागराळे., जळगांव शहर - अनुज पाटील., वरोरा - प्रवीण सूर., सोलापूर दक्षिण - महादेव कोगनुरे., कागल - रोहन निर्मळ.,, तासगांव-कवठे महाकाळ - वैभव कुलकर्णी., श्रीगोंदा - संजय शेळके., हिंगणा - विजयराम किनकर., नागपूर दक्षिण - आदित्य दुरूगकर., सोलापूर शहर- उत्तर - परशुराम इंगळे

## संपादकीय....

# थांबा, पहा अन् पुढे जा

विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षानं उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यात ९९ जणांच्या नावांचा समावेश आहे. भाजपनं बहुतांश मतदारसंघांमध्ये विद्यमान आमदारांना पुन्हा संधी दिली आहे. त्यामुळे इच्छुक नाराज झाले आहेत. याशिवाय ज्या आमदारांची नावं पहिल्या यादीत नाहीत, त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी सागर बंगला गाठला आहे. नाराजांच्या 'लाटा' फडणवीसांच्या 'सागर' बंगल्यावर गेल्या दोन दिवसांपासून धडकत आहेत. त्यातून बोध घेत आता महायुतीनं वेटिंग गेम सुरु केला आहे. भाजपनं पहिली यादी जाहीर करताच अनेक मतदारसंघांतून बंडखोरीच्या बातम्या येऊ लागल्या आहेत. काही ठिकाणी भाजपमधील इच्छुक नाराज आहेत, तर काही ठिकाणी राष्ट्रवादीतील इच्छुकांचा हिरमोड झालेला आहे. त्यामुळे आता भाजप दुसरी यादी उशिरा प्रसिद्ध करण्याच्या विचारात आहे. भाजपचे मित्रपक्षदेखील त्यांचाच कित्ता गिरवण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे शिंदेसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवार याद्याही उशिरा येऊ शकतात. महायुतीच्या उमेदवारांची यादी २८ ऑक्टोबरपर्यंत येऊ शकते. अर्ज भरण्याची अखेरची तारीख २९ ऑक्टोबर आहे. त्यामुळे एक दिवस बाकी असताना उमेदवारी यादी जाहीर करण्याची खेळी महायुतीकडून केली जाऊ शकते. त्यामुळे बंडखोरी काही प्रमाणात टाळता येईल, असं महायुतीमधील वरिष्ठांना वाटतं. आताच उमेदवार यादी जाहीर केल्यास नाराज नेते, इच्छुक महाविकास आघाडीच्या गळाला अलगद लागतील, अशी भीती महायुतीला आहे. उमेदवारी अर्ज भरण्यास एक दिवस असताना याद्या जाहीर झाल्यास होणारी बंडखोरी कमी असेल, असं महायुतीच्या नेत्यांना वाटतं. उमेदवारी देण्यास विलंब केल्यास तिकीट न मिळालेले अपक्ष लढतील. पण नाराज नेते मविआच्या गळाला कमी लागतील. कारण तोपर्यंत मविआतील पक्षांचे उमेदवार जाहीर झालेले असतील, असा महायुतीतील वरिष्ठांचा कयास आहे.

# अक्कलकोट तालुक्याचे नव भाग्यविधाते पाणीदार आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी

महाराष्ट्रासह देशभरातील आजी-माजी राजकारण्यांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वातून, नेतृत्वातून ,वक्तृत्वातून आणि सतत विकास कामांच्या माध्यमातून आपल्या मनामध्ये कायम घर केलेले आहेत. आणि त्यामाध्यमातून ते चिरकाल आपल्या स्मरणात राहतात. आणि नवख्या समाजप्रिय राजकारण्यांचे ते कळत नकळत आदर्श होऊन जातात आणि हे राजकारणी त्यांचे आदर्श डोळ्या समोर ठेवून राजकारणासोबत समाजकारण करण्याचा कसोशीने प्रयत्न करतात. माझ्या मनाला भावलेलं, मला आवडलेलं, आपलं जीवन हे संपूर्णपणे समाजकार्यासाठी, तालुक्याच्या विकासासाठी वाहून घेतलेलं आपल्या अक्कलकोट तालुक्याच लाडक लोकप्रिय व्यक्तिमत्व म्हणजेच आमदार श्री. सचिन दादा कल्याणशेट्टी साहेब...

कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या सीमेवर वसलेले ऐतिहासिक आणि श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या या अक्कलकोट तालुक्याचे लोकप्रिय आमदार श्री. सचिन दादा कल्याणशेट्टी साहेब यांच्यावरती लिहिण्याचा हा छोटासा प्रयत्न....

श्री स्वामी समर्थांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर सारख्या ग्रामीण भागामध्ये समाज-सेवेचा वसा आणि वारसा लाभलेल्या एका सुसंस्कृत आई-वडिलांच्या पोटी श्री सचिनदादा यांचा जन्म झाला. वडील श्री. पंचप्पा कल्याणशेट्टी हे शिक्षक क्षेत्रात कार्यरत असताना समाजसेवेच्या माध्यमातून तालुक्याच्या राजकारणात सक्रिय झाले. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या उक्तीप्रमाणे उपजत समाजसेवेतून राजकारणाचा वसा आणि वारसा लाभलेल्या दादांनी आपल्या शालेय जीवनापासूनच स्वतःला समाजकार्यामध्ये वाहून घेतले. त्यातूनच त्यांनी श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान या आपल्या संस्थेच्या माध्यमातून अनेक गोरगरीब अडलेल्या नडलेल्यांच्या जीवनामध्ये आधारवड म्हणून त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहू लागले. श्री.स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांनी दरवर्षी अक्कलकोट येथे सर्व धर्मीय सामुदायिक विवाह सोहळा सुरू केले, त्याचा तालुक्यासह आसपासच्या भागातील गोरगरीब गरजू नवदांपत्यांच्या लग्नगाठी जुळू लागल्या. या प्रतिष्ठानच्या माध्यमातून साहित्य, कला, क्रीडा या क्षेत्राला उभारी मिळू लागली. त्यांच्या शैक्षणिक संस्थांमधून माफक फीच्या दरातून अनेक गोरगरीब मुलं ही शिक्षण घेऊ लागले.. त्यांनी रद्दीतून शिक्षण योजना देखील चालू केली. दरवर्षी रक्षाबंधनाला ते तालुक्यातील माता भगिनीसाठी रक्षाबंधन कार्यक्रम आयोजित करतात.या माध्यमातून ते त्यांना आधार देतात.कोविड काळामध्ये त्यांनी केलेले कार्य हे खूप उत्तम आहे.. हनूर गावच्या सरपंच पदापासून ते अक्कलकोट तालुक्याचे भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष ते सध्या आमदार आणि अक्कलकोट तालुका भारतीय जनता पार्टीचे जिल्हा अध्यक्ष म्हणून काम पाहतात. या त्यांच्या समाजकार्यामुळे आपल्या अक्कलकोट तालुक्यातील सर्वसामान्य जनता आणि श्री सचिन दादा यांच्यामध्ये ऋणानुबंधांचे नाते निर्माण झाले आहे. आपल्या तालुकावाशीय अबाल वृद्ध जनतेच्या मनामध्ये ते घर करून आहेत .ते सर्वांना आपल्या स्वतःच्या घरातील आपल्या मोठ्या भावाप्रमाणे वाटतात. हे प्रेम प्रत्येकाच्या वाट्याला येतच असं नाही. हे भाग्य प्राप्त करून घेण्यासाठी आपल्या




वैयक्तिक भौतिक सुखाचा त्याग करावा लागतो. जो आदरणीय दादांनी केला आहे. म्हणूनच त्यांना इतक मोठ प्रेम तालुकावाशीय जनतेकडून मिळते आहे.

एखाद्या कसलेल्या पैलवानागत पिळदार शरीरयेस्टी लाभलेले ,दिसायला रुबाबदार, बोलायला दमदार असे आपल्या तालुक्याचे युवा आमदार यांनी आपल्या मनामध्ये एक संकल्प केला की, आपण आमदार, लोकप्रतिनिधी आहोत म्हणजे प्रजेचे मालक नसून प्रजेचे सेवक आहोत... म्हणून त्यांना आपल्या तालुक्याच्या विकासासाठी मनापासून काम करणे माहित आहे.. फक्त स्वतःच्या घरादाराच्या भल्यासाठी राजकारण करण्याच्या आजच्या जमान्यामध्ये ते २४ तास अहोरात्र आपल्या तालुक्यातील जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असतात. ते आपल्या पक्षातील वरिष्ठ नेत्यांसी जवळीक साधून, आपल्या या जवळीकीचा आपल्या तालुक्यातील जनतेसाठी विकास कामे करण्यासाठी प्रयत्न करतात.

मी तालुक्याच्या विकासासाठी एवढं काम केलं, तेवढं केलं हे नुसतं भाषणामध्ये बोलून चालत नाही,विकास कामावर गप्पा मारून चालत नाही, नुसतं विकास एका कागदावर खरडून चालत नाही तर ते विकास प्रत्यक्ष कृतीतून करावा लागतो. तेव्हा जनता स्वतःहून म्हणते होय विकास डोळ्याला दिसतोय . हे कार्य आदरणीय दादांनी आपल्या प्रचंड इच्छा शक्तीच्या जोरावर, जनतेप्रती असलेल्या प्रचंड तळमळीच्या जोरावर केलं आहे. दुसरं म्हणजे संपूर्ण अक्कलकोट तालुकावाशीय जनतेला दादांनी आपला स्वतःचा परिवार म्हणून, स्वतःचेच कुटुंब म्हणून या परिवारामध्ये विकास कामांची गंगा अवतीर्ण केली.आदरणीय श्री सचिनदादा यांनी आपल्या आमदारकीच्या काळात तालुक्यातील गोरगरीब जनतेच्या घरात घरात गेले. त्यांचे सुखदुःख मनात, कानात साठवले त्यांचे ते दुःख दूर करण्यासाठी अनेक मार्गाने प्रयत्न केले आणि दुःखाने काळवंडलेल्या त्यांच्या चेहऱ्यावरती समृद्धीचे हास्य फुलवले.अशाप्रकारे अनेकांच्या जीवनामध्ये दादांनी अमावसेची पौर्णिमा दूर करून, सुखाच्या पौर्णिमेचा चंद्र फुलवला.एखाद्या लोकप्रतिनिधीच्या, आमदाराच्या मनामध्ये जनतेप्रती फक्त कोरडा कळवळा असून चालत नाही, तर त्याला प्रत्यक्ष विकास कामाची जोड दिल्याशिवाय ते काम पूर्णत्वाला जाऊ शकत नाही, तेव्हाच जनतेच्या मनामध्ये त्या व्यक्तीबद्दल, त्या व्यक्तीमत्वाबद्दल आपोआप आदर निर्माण होतो. असे जे तालुकावाशीय जनतेच्या आदराला, प्रेमाला हक्कदार आहेत असे विकास पुरुष तालुक्याचे लोकप्रिय आमदार श्री सचिन दादा कल्याणशेट्टी साहेब. अक्कलकोटच्या या मातीमध्ये आदरणीय दादांनी आपल्या भगीरथ प्रयत्नातून विकासाची गंगा अवतीर्ण केली आहे.

पाणी म्हणजे जीवन. पण गेल्या कित्येक वर्षापासून अक्कलकोट वाशीय जनतेच्या, शेतकऱ्याच्या नशिबी हे भाग्य न्हवते.'धरण उशाला आणि कोरड घशाला 'असेच म्हणायची परिस्थिती होती. त्या उजनीच्या पाण्याने अक्कलकोट वासिय जनतेला अनेक वर्षापासून हुलकावणी दिले होते. पण आदरणीय दादांनी वरिष्ठ पातळीवर सतत अविश्रांत पाठपुरावा करून उजनीचे गंगाजल कुरनूर धरणात आणले.

उजनी धरणाच्या पाण्याच्या बाबतीत आदरणीय दादांबद्दल मला एकच लिहावसं वाटतंय ते म्हणजे त्या प्रसिद्ध दृष्टांताप्रमाणे 'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस'त्याप्रमाणे कै. माजी आमदार श्री बाबासाहेब तानवडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून या धरणाचा पाया रचला आणि आदरणीय सचिनदादा कल्याणशेट्टी साहेब यांनी उजनीचे पाणी, ते गंगाजल हे या धरणामध्ये आणून त्या धरणाला उजनीच्या या गंगाजलाने जलाभिषेक केला... आदरणीय दादांनी खरोखरच कळस बांधला.. यातून नदीकाठच्या व धरण परिसरातील शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये विकासाची समृद्धी आणण्याचे कार्य दादांनी केले.

अक्कलकोट शहराच्या सौंदर्यामध्ये भर घालणारी अनेक विकास कामे दादांनी केली आहेत आणि ते करत आहेत .त्यामध्ये अक्कलकोट शहराच्या चोहो बाजूनी पक्के सिमेंटचे रस्ते, अक्कलकोटचे ग्रामदैवत असलेले श्री मल्लिकार्जुन मंदिर जिर्णोद्धार ,अक्कलकोटच्या पोलीस स्टेशनच्या नव्या इमारतीसाठी मुबलक प्रमाणात निधी,तसेच न्यायालयाच्या बांधकामासाठी भरघोस निधी, नुकतेच आपल्या ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयासाठी भरीव निधीची तरतूद केली, ऐतिहासिक परंपरा असलेल्या हत्ती तलावाच्या सुशोभीकरणासाठी पाच कोटीचा निधी, अक्कलकोटच्या विकासासाठी दादांनी अनेक योजना आणले, अनेक विकास कामे केली. माझ्यामते सर्वात देखण आणि उत्तम कार्य आदरणीय दादांनी जे केलं ते म्हणजे आपल्या अक्कलकोटला प्रशस्त सुसज्ज असं बस स्थानक. एखाद्या सुहासिनीच्या कपाळावरती कुंकू शोभाव त्याप्रमाणे ते अक्कलकोटच्या सौंदर्यामध्ये भर घालते आहे.त्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. अक्कलकोटचे भव्य दिव्य असे बस स्थानक ज्याच्या बांधकामाला सुरुवात करताना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागले , अनेकांचा विरोध सहन करावा लागला, त्या सर्वांना पुरून उरून आदरणीय दादांनी बस स्थानकाचे कार्य मार्गी लावले.अशी अनेक चिरकाल टिकणारी कामे आदरणीय दादांनी केले आहेत. अक्कलकोट तालुक्यातील खेडेगावांमध्ये सगळीकडे चांगले रस्ते बांधले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील सर्व आमदारांवर मात करून ते सर्वाधिक निधी म्हणजेच ३८३ कोटीचा निधी आणण्यामध्ये ते पहिल्या नंबरने यशस्वी झाले. अक्कलकोट शहरामध्ये भूमिगत गटार करण्यासाठी त्याने ६८ कोटी रुपयांची भरीव निधी मंजूर केला.सोलापूर येथे होऊ घातलेल्या विमानतळासाठी, विमान चालू व्हावे यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. सर्व प्रकारची पेंडिंग कामेही त्यांनी मार्गी लावली. त्यांनी आपल्या अक्कलकोट तालुक्यातील देवस्थानांना भरीव निधी दिला त्यामध्ये वागदरीचे श्री परमेश्वर मंदिर, जेऊर येथील मंदिर, कुंभारी येथील मंदिर, हैदरा येथील दर्गा यासाठी भरीव निधी दिला. दुधनी, मैंदर्गी, अक्कलकोट पाणीपुरवठा योजनेसाठी त्यांनी भरीव निधीची तरतूद केली. त्यांनी आपल्या अक्कलकोट तालुक्यातील तडवळ सारख्या दुर्लक्षित भागामध्ये रस्ते बनवले, वेगवेगळे विकास कामे केली, शेतकऱ्यांसाठी शेत शिवारामध्ये पाणंद रस्ते बनवले,२०१९ ते २०२४ या पाच वर्षाच्या कार्यकाळामध्ये आदरणीय दादांनी अक्कलकोटच्या मातीमध्ये विकास कामाचा पाऊस पाडला. दादांचं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे ते पक्षपार्टीच्या पलीकडे जाऊन फक्त तालुक्यातील सर्वंकष जनता आणि गावाच्या विकास कामावर भर दिला. जे काम होण्यासारखे आहेत त्याला होकार आणि जे होणारच नाहीत त्यांना स्पष्टपणे नकार हे दादांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे ,मग तो एखादा नागरिक दुखावला तरी चालेल याचा ते विचार करत नाहीत. राष्ट्रपिता महात्मा गांधी नेहमी म्हणायचे की,आपल्या देशाला बळकटी तेव्हा येईल जेव्हा गावखेडे हे स्वयंभू होतील. त्या गावांमध्ये विकासकाम मार्गी लागलेले असतील. हा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आपले आमदार आदरणीय श्री.सचिनदादा यांनी पहिल्यांदाच तालुक्यातील गाव खेड्यावर आपले लक्ष केंद्रित केले आणि आपल्या तालुक्याच्या चौफेर वसलेल्या गाव खेड्यामध्ये निधीच्या रूपाने विकासाची गंगा पोहोचवली. हे करत असताना गाव खेड्यातील आपल्या कार्यकर्त्यांना बळकटी देण्याचे मनोमन प्रयत्न केले. दादांसोबत कायम असंख्य कार्यकर्त्यांचा गराडा असतो. ते आपल्या तालुक्यातील सर्व जनतेची समतापूर्वक विकास कामे करतात आणि तालुक्यातील जनताही त्यांच्यावर पुत्रवत प्रेम करते. दादांचे कुटुंब हे कोणत्याही निर्णयात त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असते. अक्कलकोट शहराचे नगरसेवक आदरणीय मिलनददादा, हनूर गावचे उपसरपंच आदरणीय सागरदादा यांच्यासह त्यांचे सर्व बंधू हे त्यांच्यासोबत खंबीरपणे कायम उभे असतात. तालुक्यातील जनतेच्या सुखदुःखात ते कायम सोबत असतात .दादा रात्री उशिरापर्यंत मतदार संघातील वेगवेगळ्या गटातील, विभागातील, गावातील समस्यांबाबत स्थानिक प्रतिनिधींची चर्चा करतात, त्या समस्या लवकरात लवकर कशा सोडवल्या जातील यासाठी ते आपल्या परीने प्रयत्न करतात. आठवड्याच्या दर सोमवारी ते जनता दरबार भरवतात, त्यावेळेला ते आपल्या तालुकावाशीय जनतेच्या अडीअडचणी समस्या ऐकून घेतात, त्यातून ते मार्ग काढतात. आपल्या कामाच्या माध्यमातून विरोधी विचाराच्या व्यक्तीच्या मनामध्ये देखील ते परिवर्तन घडवून आणण्यात तरबेज आहेत. कोणत्याही नेत्याला हे विकासाचे ध्यास असलं पाहिजे, तो नेता हा सखल जनता हे माझं कुटुंब आहे या भावनेतून विकास कामासाठी स्वतःला झपाटून घेऊन कार्य करत रहावे लागते, तेव्हा तो आपसूकच लोकनेता बनत असतो. मग आपण या तालुक्यासाठी काय केलं? हे ढोल बडवून सांगायची गरज राहत नाही. तालुक्यातील सकळ जनताच, होय दादांनी आपल्या तालुक्यांचा सर्वस्पर्शी ,सर्वसमावेशक विकास केला आहे हे सांगत असते. आपल्या समस्या या गावकऱ्यांनी आपल्या लोकप्रतिनिधी समोर पोहोचवण हे देखील खूप महत्त्वाच असतं .तेव्हा ते काम कायमस्वरूपी मार्गी लागल्याशिवाय राहणार नाही. हे देखील गाव खेड्यातील जागरूक नागरिकांनी, तरुण कार्यकर्त्यांनी लक्षात घेतलं पाहिजे. आपल्या तालुक्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी महाराष्ट्राच्या राजधानी पासून ते देशाच्या राजधानी पर्यंत अनेकदा प्रवास करून ,तेथील त्या त्या क्षेत्रातील मंत्र्यांशी, अधिकाऱ्यांशी चर्चा करून ,केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी साहेब यांच्याकडे स्वतः वैयक्तिक तालुक्यातील, जिल्ह्यातील रोडच्या कामासंदर्भात अनेक वेळा गाठीभेटी घेऊन, आपल्या तालुक्यामध्ये राष्ट्रीय राज्यमहामार्ग गावखेड्याचे रस्त्याचे जाळे हे आदरणीय दादांनी विणले.त्यांनी कधी हिंदू मुस्लिम, मंदिर मज्जिद असा भेदभाव न करता त्यांना समान निधी दिला आणि समतेची वागणूक दिली. आदरणीय दादांसारखे असे लोकनेते जर सर्वच तालुक्याच्या वाट्याला आले तर आपला देश विकसित झाल्याशिवाय राहणार नाही. आदरणीय दादांचं वैशिष्ट्य म्हणजे दादांचा चेहरा हा सतत हसरा असतो .प्रसंग कोणताही असो त्यातून ते सकारात्मक मार्ग काढण्यात तरबेज आहेत. ते आपल्या वरिष्ठांच्या मनामध्ये भक्कम स्थान निर्माण करून आणि विश्वास संपादन करून स्थानिक विकास कामाच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणावर आपली मजबूत पकड निर्माण केली आहे.

धरणी मातेच्या उदरामध्ये आपला शेतकरी दादा धान्याच्या एका दाण्याची पेरणी करतो आणि त्यातून ती धरणीमाय त्या शेतकऱ्याच्या पदरात हजारो दाणे दान म्हणून घालते. नेमकं त्याप्रमाणेच आपल्या अक्कलकोटवाशिया जनतेने मतदान रुपी दान देऊन २०१९ च्या इलेक्शनमध्ये दादारुपी सशक्त, सुदृष्ट बियाणाच रोपण या अक्कलकोटच्या पवित्र भूमीमध्ये केलं आणि आदरणीय दादांनी त्या संधीच सोनं करत विकासरुपी अनेक दाणे जन्माला घालण्याचं काम केलं.आता पुन्हा एकदा विकासाचे महामेरू असलेल्या दादांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून, त्या विकास कामांचा महासागर बनण्यासाठी दादांना बळ द्यावेच लागेल. दादा हे फक्त आमदार असताना एवढे विकास काम करू शकतात. या वेळेला ते नामदार झाले तर आपला अक्कलकोट तालुका सर्वच बाबतीत सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहूच शकत नाही. त्यासाठी प्रत्येक तालुकावाशीय मी 'दादांचा आणि दादा माझे' या एकाच भावनेतून त्यांना साथ द्यावी लागेल. त्यांना कोणत्या एका वैयक्तिक जाती धर्मात न अडकवता फक्त आणि फक्त विकास ही एकच जात समजून त्यांना पाठबळ द्यावे लागेल. आणि हा अक्कलकोटचा रांगडा बुलंद आवाज त्या महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये आपल्या तालुक्याचे प्रश्न मांडण्यासाठी ते सोडवण्यासाठी, आपल्या हक्काचा माणूस आदरणीय आमदार श्री सचिन दादा कल्याण शेट्टी साहेब यांना पुन्हा एकदा मतदान रुपी पाठबळ देऊन त्यांना विजयी करावंच लागेल.

आदरणीय दादांचं कार्य इतक उत्तुंग आहे की ते या शब्दामध्ये कैद करण्या पलीकडचं आहे...त्यांच्या या लोकसेवेच्या कार्यास मनापासून सलाम करून आणि त्यांच्या विजयाची मनोभावे कामना करून मी येथेच थांबतो.

**धन्यवाद..**

**आपलाच एक सुजाण मतदार.**



# अनंत चैतन्यप्रशालेत आकाश कंदील, पणती व भेटकार्ड निर्मिती कार्यशाळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनीधी

दिवाळी म्हणजे आनंदाचा, प्रकाशाचा सण या सणात रात्री, पहाटे घरोघरी पणत्या तेवत असतात, दीप उजळत असतात तर दिवाळीची रोषणाई खऱ्या अर्थाने जाणवते ती लुकलुकणाऱ्या दिव्यांच्या माळा आणि झगमगणाऱ्या आकाश कंदीलांमुळेच तसेच आप्तजनांना विविध सण उत्सवात विशेष करुन दिवाळीत शुभेच्छा पर भेटकार्ड देऊन एकमेकांविषयी स्नेहभाव व्यक्त करण्याची आपली परंपरा आहे म्हणून पणती, भेटकार्ड, आकाशकंदील च्या विविध प्रकारच्या कलाकृतीबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये रचनात्मक कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने आजरोजी महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे आकाशकंदील, पणती, भेटकार्ड निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत भरभरून प्रतिसाद दिला.व पर्यावरणपूरक अनेक रंगीबेरंगी आकाशकंदील, वेगवेगळ्या आकाराच्या पणत्या व अतिशय सुंदर असे भेटकार्ड विद्यार्थ्यांनी बनवल्या.प्रशालेचे कलाशिक्षक राजेंद्र यंदे यांचे या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

या सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे संचालक व मार्गदर्शक श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, उपसरपंच व युवा नेते सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी, प्राचार्य अशोक साखरे यांनी कौतुक केले. यावेळी पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे, जेष्ठ शिक्षक सरदार मत्तेखाने,अब्दुल अजीज मुल्ला, शिक्षिका मृदुलादेवी स्वामी, स्वप्नाली जमदाडे,प्रयोगशाळा सहाय्यक स्वामीनाथ कोरे, ग्रंथपाल काशीनाथ हताळे,सेवक शिवप्पा घोडके उपस्थित होते.




# निफाड नगरपंचायत तर्फे मतदान जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे कामकाजास सुरुवात झालेली असून मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे संदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी १२१, निफाड विधानसभा मतदार संघाचा उपविभागीय अधिकारी निफाड यांनी मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले असून नगरपंचायतीतर्फे अमोल चौधरी मुख्याधिकारी निफाड नगरपंचायत, निफाड त्यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड शहरातील सर्व शाळा, विद्यालय, महाविद्यालय, येथील विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली. त्याविषयी सर्व शाळांमध्ये मतदान जनजागृती विषयक निबंध लेखन, वकृत्व स्पर्धा रांगोळी स्पर्धा, चित्रकला, मतदान रॅली, पथनाट्य, असे विविध प्रकारचे कार्यक्रम राबविणे विषयी आव्हान करण्यात आले.

सर्व विद्यार्थ्यांनी आपले आई-वडील, अठरा वर्षावरील आपले भाऊ-बहीण तसेच आपले सर्व नातेवाईक यांनी दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीत आपल्या मतदानाचा बहुमूल्य अधिकार बजावून आवश्यक मतदान करावे याविषयी मतदान संकल्पपत्र भरून घेणे विषय आव्हान करण्यात आले. तसेच सर्व निफाड शहरातील रा.प महामंडळ बस स्थानकावर तेथील उपस्थित प्रवासी यांना मतदानाविषयी महत्व पटवून जनजागृती करण्यात आली. सदर कार्यक्रमाप्रसंगी निफाड नगरपंचायत, निफाड या कार्यालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble


■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कर्मयोगी शंकररावजी पाटील व नीरा भीमा कारखान्याकडून रु. २०० प्रमाणे ऊस बिलाचा हप्ता बँकेत वर्ग

## राजवर्धन पाटील व लालासाहेब पवार यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी, अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील महात्मा फुलेनगर (बिजवडी ) येथील कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखाना व शहाजीनगर येथील नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याकडून गळीत हंगाम सन २०२३-२४ साठी ऊस बिलाचा दिवाळीसाठी प्रति टन रु. २०० प्रमाणे हप्ता हा शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये आज मंगळवारी (दि.२२) वर्ग करण्यात आला आहे, अशी माहिती कर्मयोगी शंकररावजी पाटील कारखान्याचे संचालक राजवर्धन पाटील व निरा भिमा कारखान्याचे अध्यक्ष लालासाहेब पवार यांनी इंदापूर येथे मंगळवारी (दि.२२) दिली.



माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे नेतृत्वाखाली हे दोन्ही कारखाने उत्कृष्टरित्या कार्यरत आहेत. या दोन्ही कारखान्यांनी यापूर्वी शेतकऱ्यांना रु. २७०० प्रमाणे ऊस बिलाची रक्कम वेळेवरती अदा केलेली आहे. कर्मयोगी शंकररावजी पाटील व निरा भिमा कारखान्याच्या संचालक मंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांना ऊस बिलाचा दिपावलीसाठी रु. २०० प्रमाणे हप्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती राजवर्धन पाटील व लालासाहेब पवार यांनी दिली.

तसेच या दोन्ही कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना एक महिन्याचा पगार बोनस म्हणून दिवाळीसाठी देण्यात येणार आहे. आगामी सन २०२४-२५ च्या गळीत हंगामासाठी दोन्ही कारखाने सज्ज झाले आहेत. आगामी गळीत हंगाम यशस्वी करणेसाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही याप्रसंगी त्यांनी केले.

या दोन्ही कारखान्यांमध्ये कामगारांचे पगार नियमितपणे होत आहेत, मात्र गैरसमज निर्माण केला जातो, कारखान्याचे बदनामी केली जात आहे. कारखान्या संदर्भात चुकीच्या गोष्टी करू नका, या संस्था शेतकऱ्यांच्या आहेत, असे आवाहन यावेळी राजवर्धन पाटील यांनी केले. याप्रसंगी नीरा भीमा कारखान्याचे संचालक विलासराव वाघमोडे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी दोन्ही कारखान्याचे संचालक मंडळ, कार्यकारी संचालक उपस्थित होते.

**कारखान्यांची बदनामी थांबवावी : लालासाहेब पवार**

**कर्मयोगी शंकररावजी पाटील व निरा भीमा कारखाने चांगल्या पद्धतीने चालत आहेत. ऊस बिले वेळेवर अदा केली आहेत. कर्मचाऱ्यांचे नियमित पगार होत आहेत. मात्र ज्यांना संस्था काढून रोजगार देण्याचे माहित नाही, तेच कर्मचाऱ्यांच्या पगारा संदर्भात गैरसमज पसरवत आहेत. या चांगल्या चालत असलेल्या दोन्ही संस्था आगामी काळात निश्चितपणे महाराष्ट्रात नावारूपास येतील, असा विश्वास यावेळी बोलताना निरा भीमा कारखान्याचे अध्यक्ष लालासाहेब पवार यांनी व्यक्त केला.**

**विरोधक सहकारी संस्था का काढत नाहीत? : राजवर्धन पाटील**

**विद्यमान लोकप्रतिनिधीकडे दुग्धविकास खाते होते, तरीही त्यांनी तालुक्यामध्ये दुध डेअरी का काढली नाही? १० वर्षाच्या काळात त्यांनी सहकारी संस्था का निर्माण केल्या नाहीत? तसेच १० वर्षात एकही शाळा-महाविद्यालय का काढले नाही? विद्यमान लोकप्रतिनिधी संचालक असलेल्या छत्रपती कारखान्याची २ वर्षे वार्षिक सर्वसाधारण सभा का घेतली नाही? छत्रपती कारखान्याच्या सध्याच्या संचालक मंडळाला १० वर्षे होत आली तरीही निवडणूक का घेत नाहीत? या सर्व प्रश्नांची उत्तरे विरोधक का देत नाहीत, असा सवाल राजवर्धन पाटील यांनी केला. इंदापूर तालुक्यात अनेक सहकारी संस्था निर्माण करून, त्याद्वारे रोजगार निर्माण करून, सतत येणाऱ्या विविध अडचणीवर मात करून संस्था यशस्वीपणे चालविण्यासाठी हिम्मत लागते, ती हिंमत फक्त हर्षवर्धन पाटील यांच्याकडे आहे. हर्षवर्धन पाटील यांनी कष्ट घेऊन, सतत वेळ देऊन, त्रास सहन करून, जिद्दीने व मेहनतीने उभारलेल्या संस्थांवर राजकीय स्वार्थासाठी टीका करणे सोपे असते, असा टोला राजवर्धन पाटील यांनी विरोधकांना लागावला.**

## थोडक्यात...

### अहिल्यानगर-सोलापूर महामार्गावर माहीजळगाव येथे भीषण अपघातात दोन युवक ठार

नगर : नगर सोलापूर महामार्गावर कर्जत तालुक्यातील माहीजळगाव बायपास जवळ भीषण अपघात यामध्ये दोन तरुणांचा मृत्यू झाला असून एकाचा जागेवरच तर दुसरा मिरजगाव येथील लोकमान्य हॉस्पिटल उपचार घेत असताना मृत्यू झाला आहे. भीषण अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला एकाचा जागेवरच तर दुसरा मिरजगाव येथील लोकमान्य हॉस्पिटल उपचार घेत असताना मृत्यू झाला आहे. नगर सोलापूर महामार्गावर कर्जत तालुक्यातील माहीजळगाव बायपास जवळ भीषण अपघात यामध्ये दोन तरुणांचा मृत्यू झाला असून एकाचा जागेवरच तर दुसरा मिरजगाव येथील लोकमान्य हॉस्पिटल उपचार घेत असताना मृत्यू झाला आहे. सोमनाथ दत्तात्रय कदम (वय २४) व शिवाजी बबन कदम (वय ३५) दोघेही राहणार कोकरवाडी तालुका परंडा जिल्हा धाराशिव येथील आहेत. याबाबत घडलेली घटना अशी की आज दिनांक २२ ऑक्टोबर रोजी सोमनाथ कदम व शिवाजी कदम हे दोघे काही कामानिमित्त कोकरवाडी तालुका परंडा येथून करमाळा मार्गाने हिरो होंडा स्प्लेंडर या क्रमांक एम एच ४५ आर ९७१८ या दुचाकीवरून मिरजगावच्या दिशेने येत असताना व अज्ञात वाहन मिरजगाव कडून करमाळ्याच्या दिशेने जात असताना नगर सोलापूर महामार्गावर माहीजळगाव बायपास जवळ दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास समोरासमोर जोराची धडक होऊन सोमनाथ दत्तात्रय कदम याचा जागीच मृत्यू झाला तर शिवाजी बबन कदम याचा मिरजगाव येथील लोकमान्य हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान निधन झाले आहे. शिवाजी भगवान कदम हा विवाहित असून पत्नी व लहान दोन मुले असा परिवार आहे. अपघाताची माहिती मिळताच मिरजगाव येथील जीवन ज्योत रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचून अपघातग्रस्तांना मिरजगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले तर शिवाजी कदम यांचा श्वास चालू असल्यामुळे त्यांना लोकमान्य हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल केले होते परंतु त्याची ही प्राणज्योत मालवल्यानंतर शिवछेदनासाठी मिरजगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात घेऊन आले. अपघाताची फिर्याद अपघातग्रस्त मयताचे नातेवाईक अशोक मधुकर लोखंडे राहणार मुर्शिदपूर तालुका आष्टी जिल्हा बीड यांनी दिली असून पुढील तपास कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे व मिरजगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार दत्तात्रय कासार हे करत आहेत.

# राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी १९ आक्टोबर १८८२ ला हंटर कमिशनला सादर केलेल्या निवेदनावर ७० वी कार्यशाळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने भारतीय समाज क्रांतीचे पितामह राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी १९ ऑक्टोबर १८८२ ला हंटर कमिशनला निवेदन सादर केले होते. या ऐतिहासिक कृतीच्या १४२ व्या वर्धापनदिनानिमित्त २० ऑक्टोबर २०२४ ला ७० व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना माजी शिक्षणाधिकारी डॉ. रमेशचंद्र धनेगांवकर म्हणाले की, लार्ड रिपन यांनी १८८२ मध्ये विल्यम विल्सन हंटर यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोगाची स्थापना केली होती. या आयोगातील उर्वरित २० सदस्यांनी महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या होत्या. लार्ड मेकॉले यांनी फिल्टर डाऊन थेअरीचा सिद्धांत मांडला होता.

याप्रसंगी इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, आधी कळस आणि नंतर पाया अशी फिल्टर डाऊन थेअरीची स्थिती होती. समाजातील सर्वांनाच मोफत व सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे. सामान्य जनता महागडे शिक्षण घेऊ शकत नसल्याने गरीब श्रीमंतातील शैक्षणिक दरी रुंदावत चालली होती. म्हणून जनतेकडून गोळा केलेला कर शिक्षणावर खर्च केला पाहिजे, असे फुल्यांनी स्पष्ट केले होते. इंजिनिअर एन. डी. जिवने म्हणाले की, बहुजन समाजातील युवकांसह महिलांच्या सुप्त गुणांना वाव देऊन सशक्तीकरणावर भर दिला पाहिजे. मिलिंद बागूल म्हणाले की, आज घराबाहेर पडताना मुलींने प्रश्न विचारला होता की, कुठे चाललात? तर सत्संगाला चाललो असल्याचे सांगून आलो. आता या कार्यशाळेतील सत्संगाने व्यापक रूप धारण करण्याची गरज आहे. महादेव डांबरे म्हणाले की, सर्व शैक्षणिक संस्थांचे राष्ट्रीयीकरण करून व्यवस्थापनाचा आर्थिक भार प्रशासनाने उचलला पाहिजे. पहिले उपेक्षितांना व नंतर अपेक्षितांना शिक्षण दिले पाहिजे.

प्रमुख वक्ते एड. राजू बागूल म्हणाले की, शिक्षण हा तिसरा डोळा आहे. युनेस्कोच्या मार्गदर्शिकेप्रमाणे वैज्ञानिक दृष्टिकोन असणारे मूलभूत मूल्यवर्धित शिक्षण दिले पाहिजे. भूतलावरील सर्वच सजीवांना जीवन जगण्याचा अधिकार आहे. याची जाणीव ठेवून आपल्या हक्क अधिकारांची पूर्तता करण्यासाठी कर्तव्याचे पालन सुद्धा केले पाहिजे. पुणे जिल्ह्यातील वाबळेवाडी येथील शिक्षण संस्थेचा आदर्श बाळगून शिक्षण व्यवस्था विकसित केली पाहिजे. नोबेल पारितोषिक विजेते प्रोफेसर मोहमद ऊल हक यांची आदर्श प्रणाली स्विकारली पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकाचे व त्यांच्या टीमचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत. राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी हंटर कमिशनला दिलेले निवेदन आजही तेवढेच प्रासंगिक आहे. त्यातील मागण्यांची अंमलबजावणी केली असती तर आपल्या शिक्षण व्यवस्थेची दुरावस्था झाली नसती. त्यात प्राथमिक व उच्च शिक्षणाविषयी व्यक्त केलेले विचार उच्च कोटीचे आहेत. सरकार शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण करण्याऐवजी शाळा बंद करीत आहे, हे अधोगतीचे द्योतक आहे? एक देश, एक शिक्षण व एकसमान अभ्यासक्रम असावा. मानवीय व्यवहारात मैत्री स्थापित करण्यासाठी परस्परांना संदेश देण्यासाठी केल्या जाणाऱ्या संपर्क प्रक्रियेत होणाऱ्या संवादाचे रुपांतर सुसंवादयुक्त होण्यासाठी आवश्यक उच्च कोटीचे शिक्षण दिले पाहिजे.

कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार किमान ६ टक्के बजेट शिक्षणावर खर्च केला पाहिजे. बहुजन समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना विशेष शिष्यवृत्ती प्रदान करून प्रशिक्षित करण्याचे प्रयोग राबवून बेरोजगारी कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

या कार्यशाळेला पंकज गजभिये, बी. एस. भालेराव, राहूल मेश्राम यांनीही मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन महादेव डांबरे तर प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी केले. सुरूवातीला मान्यवरांचे हस्ते आदर्शांना पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या. या कार्यशाळेला एन. डी. जिवने, उद्योजक मिलिंद बागूल, इंजिनिअर किशोर पाटील, साधू आनंद, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.


# एम.के.सी.एल. पुणे आणि स्वेरी यांच्यात सामंजस्य करार स्थापित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुण्यातील महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड (एम.के.सी.एल.) आणि गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट यांच्यामध्ये नुकताच सामंजस्य करार स्थापन करण्यात आला. या करारामुळे विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांवर आधारित कोर्सेसच्या संदर्भात फायदा होणार आहे.



स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सुरुवातीला एम.के.सी.एल. च्या अधिकाऱ्यांचे स्वागत करून 'स्वेरीच्या वाटचालीतील महत्वाचे टप्पे, महत्वपूर्ण मानांकने, विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून देण्यात येणाऱ्या शिक्षणात राबविण्यात येणारे विविध उपक्रम, संशोधन विभागाची गरुड झेप आणि एम.के.सी.एल. व स्वेरी यांच्यामधील परस्पर सहकार्य व सामंजस्य याबाबत माहिती दिली. यावेळी एम.के.सी.एल. पुणेचे सोलापूर जिल्हा विभागप्रमुख रोहित जेऊरकर यांनी एम.के.सी.एल. संदर्भात माहिती देवून त्याअंतर्गत असणारे 'क्रेडीट कोर्स' व स्वेरी या संस्थेमध्ये आपण ते कसे राबवू शकतो याची सविस्तर माहिती दिली. यामध्ये प्रामुख्याने कटिंग एज टेक्नोलॉजी, नॉलेज हब, रिसर्च इनोव्हेशन, व्होकेशनल स्कील कोर्सेस आणि ॲबिलीटी एनहान्समेंट कोर्सेस यांचा समावेश आहे. एम.के.सी.एल. ही संस्था स्वेरीला 'आय लाईक' क्रेडीट कोर्सेस ऑफर करण्यात 'नॉलेज पार्टनर' म्हणून काम करेल. स्वेरी संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पदवी), कॉलेज ऑफ फार्मसी (पदवी), कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पदविका) व कॉलेज ऑफ फार्मसी (पदविका) या महाविद्यालयांमधील सर्व विद्यार्थ्यांना या क्रेडीट कोर्सेसचा फायदा होणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमातही या कोर्सेसचा फायदा होईल. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) या विद्यार्थ्यांच्या ॲकड्मिक बँक क्रेडीट मध्ये हे क्रेडीट ट्रान्सफर होतील तर स्वेरी अंतर्गत असलेल्या अन्य महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी हे कोर्सेस ॲड ऑन कोर्स म्हणून राबविले जातील. या करारानंतर स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे म्हणाले की, 'एम.के.सी.एल. बरोबर हा पहिलाच करार असून एम.के.सी.एल. च्या अधिकाऱ्यांसोबत केलेल्या चर्चे नंतर हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असल्याचे दिसून येते. याचा स्वेरीतील विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होणार आहे.' हा सामंजस्य करार स्थापित करण्यासाठी एम.के.सी.एल. पुणे च्या व्यवस्थापकीय संचालिका सौ. मीना कामत व सहव्यवस्थापक समीर पांडे यांचे बहुमोल सहकार्य लाभले. या कराराप्रसंगी एम.के.सी.एल., पुणेचे कार्यक्रम व्यवस्थापक जुहेब पार्कर, स्थानिक अग्रणी केंद्र समन्वयक हारूण शेख, एसबीयु समन्वयक मलिक शेख, मार्केटींग एक्झिक्युटिव्ह शेखर अडगळे, तसेच स्वेरीच्या वतीने उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. एम.पी. ठाकरे, स्वेरीचे तांत्रिक समन्वयक प्रा. अंतोष द्याडे, संशोधन व विकास अधिष्ठाता डॉ. ए.पी. केने, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रा. ए.ए.मोटे, सामंजस्य कराराचे स्वेरीचे समन्वयक डॉ. एन.पी. कुलकर्णी आदी प्राध्यापक उपस्थित होते. हा सामंजस्य करार झाल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी अभिनंदन केले.



# टाकळीवाडी येथे पावसात महिलांनी घेतला महाप्रसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी :टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे श्री गणेश मंदिर असून प्रत्येक संकष्टीला येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात येत असते. अनेक लहान बालके, वयोवृद्ध स्त्रिया,नागरिक, मोठ्या प्रमाणात मंदिरामध्ये येत असतात. मंदिरासमोर निवारा शेड नसल्यामुळे संकष्टीला उभ्या पावसात महिला, नागरिक, वयोवृद्ध महिलांनी, लहान बालके, महाप्रसाद घेतला. अनेक महिलांनी आपली नाराजी व्यक्त केली.

## विधानसभा निवडणुकीसाठी अधिसुचना जारीः २९ ऑक्टोबरपर्यंत स्वीकारले जाणार अर्ज

## निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे

# पंढरपूर विधानसभा मतदारसंघासाठी ४१ नामनिर्देशन पत्राची विक्री



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : २५२-पंढरपूर विधानसभा निवडणुकीची अधिसूचना मंगळवार दि. २२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तर नामनिर्देशन पत्र विक्री व स्विकृती देखील सुरु करण्यात आलेली आहे. २५२ पंढरपूर विधानसभा मतदारसंघासाठी मंगळवार दिनांक दि.२२ ऑक्टोबर २०२४ रोजी २९ जणांनी ४१ नामनिर्देशनपत्र पत्र खरेदी केले असून, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या पहिल्या दिवशी एकही नामनिर्देशनपत्र दाखल झाले नसल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर रोजी संपत आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोंबर रोजी विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार निवडणुकीची अधिसूचना मंगळवार (दि.२२) जारी करण्यात आली आहे. या दिवसापासूनच मतदारसंघांत उमेदवारी अर्ज विक्री करण्यात येत असून अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारसह पाच जणांना प्रवेश मिळणार आहे. शंभर मीटर आवारात फक्त तीन वाहनांना प्रवेश मिळणार आहे. दि. २९ ऑक्टोबर पर्यंत उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार असून दि ३० ऑक्टोंबर रोजी अर्जाची छाननी होणार आहे. दि ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. दि.२० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून दि. २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे.

प्रत्येक मतदारसंघात निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात उमेदवारांच्या फक्त तीन वाहनांना प्रवेश मिळणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना देखील उमेदवारासह फक्त पाच जणांना प्रवेश दिला जाणार आहे. या परिसरात मिरवणूक, सभा घेण्यास तसेच कोणत्याही प्रकारची घोषणा, वाद्य वाजविण्यास प्रतिबंध असणार आहे.

उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी suvidha.gov. In पोर्टल उपलब्ध केले आहे.मात्र अर्ज डाऊनलोड करुन प्रत्यक्षात निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावा लागणार आहे. उमेदवारी अर्ज भरताना मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना एकच सूचक असणार आहेत. अपक्ष व इतर पक्षांच्या उमेदवारांना १० सूचक लागणार आहेत. ते सूचक मतदारसंघातील मतदार असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

## थोडक्यात...

### 'घड्याळ' चिन्हाबाबत उद्या सुनावणी; शरद पवार गटाची बाजू ऐकण्याची तयारी

नवी दिल्ली ; राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला 'घड्याळ' चिन्ह वापरण्यापासून रोखण्यासाठी शरद पवार गटाने केलेल्या याचिकेवर गुरुवार, २४ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. न्या. सूर्यकांत आणि न्या. उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी होईल. उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत २९ तारखेला संपणार असल्यामुळे तत्पूर्वी याबाबत निर्णय दिला जावा, अशी याचिकाकर्त्यांची अपेक्षा आहे. पक्षाच्या दोन्ही गटांना चिन्हाच्या वापरापासून रोखण्याच्या मागणीसाठी ही याचिका करण्यात आली आहे. शरद पवार गटाच्या वकिलांनी मंगळवारी न्यायालयाला सांगितले की, याचिकेवर आज सुनावणी होणे अपेक्षित होते. मात्र खटल्यांच्या सूचीमध्ये याचा समावेश नाही. त्यावर, 'यापूर्वीच न्यायालयाने यासंदर्भात आदेश दिला होता आणि तो दोन्ही बाजूंनी मान्य करण्यात आला होता,' असे न्यायालयाने म्हटले.

# सहाय्यक निवडणूक नोडल अधिकारी प्रकाश शिंदे यांचे कार्य कौतुकास्पद : जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

## सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी घेतला आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/राहुल साबळे : २२ ऑक्टोबर २०२४ रोजी मा. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी बुलढाणा श्री. डॉ. किरण पाटील सिंदखेडराजा मतदार संघाला भेट दिली.

लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये प्रचार व प्रसार माध्यम समिती चे नोडल अधिकारी अंकुश म्हस्के आणि सहाय्यक नोडल अधिकारी प्रकाश शिंदे यांनी केलेल्या कामाची पाहणी केली तसेच वर्तमानपत्रातील बातम्यांचे संग्रह केलेली



फाईल दाखवली असता मा.जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. पाटील यांनी केलेल्या कामाचे मनापासून कौतुक केले.

मा. उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांचे मार्गदर्शन आणि त्यांनी दाखवलेला विश्वास तसेच वेळोवेळी त्यांनी प्रसारमाध्यम समितीला केलेल्या सूचना आणि आम्ही त्या सूचनांवर केलेली अंमलबजावणी यातूनच आमच्या पूर्ण टीमला मोकळेपणाने काम करायची ताकद मा. खडसे साहेबांनी दिली, अशी माहिती सहाय्यक नोडल अधिकारी प्रकाश शिंदे यांनी दिली.

तसेच तत्कालीन मा. तहसीलदार सिंदखेडराजा श्री. धानोरकर मा. तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, मा. निवडणूक नायब तहसीलदार सिंदखेड राजा श्री. मनोज सातव मा.निवडणूक नायब तहसीलदार देऊळगाव राजा अस्मा मुजावर, उमेश गरकळ, संजय सोनुने यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन वेळोवेळी लाभले.

**प्रसार माध्यम चे नोडल अधिकारी श्री. अंकुश म्हस्के साहेबांनी सुद्धा चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले जेणेकरून सर्वांना काम करण्यासाठी एक विश्वासपूर्ण वातावरण मिळाले. म्हस्के सरांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण टीमने चांगल्या प्रकारे काम पूर्ण केले.**

या सर्व प्रक्रियेमध्ये सर्वात महत्वाचा वाटा हा आपल्या सर्व पत्रकार बांधवांचा आहे, कारण सिंदखेडराजा मतदारसंघातील सर्व पत्रकार बांधवांनी खूप चांगल्या प्रकारे लोकसभा निवडणुकीमध्ये प्रसार माध्यमाला प्रसिद्धी मिळवून दिली. आपण सर्वानी वेळोवेळी दिलेल्या बातम्या यामुळेच आपला हा बातम्याचा संग्रह होऊ शकला, त्यामुळे या सर्व प्रक्रियेमध्ये सर्व पत्रकार बांधवांचे योगदान खूप मोठे आहे तसेच सर्वांच्या सहकार्याने विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये सुद्धा असेच चांगले काम करू असे सहायक नोडल अधिकारी प्रकाश शिंदे यांनी सांगितले.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सासवड पोलिस स्टेशन येथे पोलीस पाटील बैठक संपन्न



पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर : सासवड पोलीस स्टेशन येथे ऋषिकेश अधिकारी : वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सासवड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व गावातील पोलीस पाटील यांच्या बैठकीचे नियोजन करण्यात आले होते.

या वेळी मार्गदर्शन करताना साहेबांनी सांगितले कि विधानसभा सार्वत्रिक २०२४ निवडणूक ही एकाच वेळी संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाने दिलेल्या सर्व नियमांचे काटेकोर पालन झाले पाहिजे.पोलीस पाटील यांनी सतर्क राहून वेळोवेळी सर्व गोष्टी वर बारीक लक्स ठेवणे गरजेचे आहे.

उमेदवारांच्या रॅली ची वेळ वेगवेगळी असावी, तसेच दोन्ही उमेदवारांच्या सभेची वेळ वेगवेगळी असेल, सभेचे स्टेज समोरासमोर असू नये, या सर्व गोष्टीवर बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे, मतदानाच्या दिवशी मतदारांनी मतदान केंद्रात मोबाईल आणू नये, येताना ओळखपत्र बरोबर असावे आधार कार्ड किंवा मतदान ओळखपत्र हे मतदारासोबत असणे गरजेचे आहे, तसेच मतदान केंद्रापासून १०० मीटर च्या पुढे वाहने पार्क करावी या सर्व गोष्टीबद्दल मतदारांमध्ये जागृती करावी, जेणेकरून निवडणुकीच्या दिवशी मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही, या सर्व गोष्टीबद्दल ऋषिकेश अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सासवड पोलीस स्टेशन यांनी सर्व पोलीस पाटील यांना मार्गदर्शन केले. यावेळी विविध गावचे पोलीस पाटील हजर होते. मीटिंगचे आयोजन गोपनीयचे रुपेश भगत साहेब यांनी ऋषिकेश अधिकारी: वरिष्ठ पोलीस निरीक्षक साहेबांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.

# गुंजाळा शिवारात अज्ञात आरोपीने सोयाबीनची सुडी पेटविली

## शेतकऱ्याचे हजारोचे नुकसान, अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चिखली तालुका प्रतिनिधी / कैलास आंधळे



चिखली तालुक्यातील गुंजाळा येथील शेतकरी भिमराव वानखडे यांच्या गावाजवळच्या शेतातील सोयाबीन सुडी अज्ञात आरोपीने पेटवून देऊन हजारो रुपयांचे आर्थिक नुकसान केले आहे.ही घटना दिनांक २० ऑक्टोबर रोजी ८.०० वाजता घडली, एकीकडे शेतकरी आसमानी व सुलतानी संकटात सामोरे जात असतानाच तसेच यावर्षी एकरी सोयाबीन तीन ते चार पोते होत असताना अशा घटना अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गुंजाळा येथील शेतकरी भीमराव वानखेडे यांचे गावालगतच गट नंबर१४० मध्ये एक एकर जमीन आहे.या शेतात त्यांनी सोयाबीन पेरणी केली होती.त्या शेतावर त्यांची बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचे पीक कर्ज घेतले होते अशी माहिती मिळाली. कुटुंबाचा उदरनिर्वाह व बँकेचे कर्ज फेडण्यासाठी त्यांनी शेतात सोयाबीनचा पेरा करून चांगल्या प्रकारचे उत्पन्न होईल या आशेने चांगलीच मेहनत घेतली होती.सोयाबीनचे पीक ही चांगले आले होते.सोयाबीनची सोंगणी करून त्यांनी शेतामध्ये सुडी घातली होती.पावसाने सुडी भिजू नये म्हणून त्यावर महागडी ताडपत्री टाकली होती.सोयाबीनची सुडी काढण्याची बाकी होती परंतु परतीचा पाऊस सुरू झाल्यामुळे सुढी काढणे लांबले. पाऊस उघडल्यानंतर ते कुटुंब सुढी काढणार होते परंतु दिनांक १८ ऑक्टोबर रोजी रात्री ८.०० वाजेच्या दरम्यान कोणी अज्ञात व्यक्तीने पेट्रोल व डिझेल टाकून सोयाबीनची सोडी पेटवून दिली. घटनेची माहिती शेजारील शेतकऱ्याने फिर्यादीला दिली. हे कुटुंब शेतात जाऊन पाहतात तर सुडीवर झाकण ठेवलेल्या ताडपत्रीसह सोयाबीनची सुडी जळून राख झालेली होती.या घटनेमुळे शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले झाले असून या कुटुंबावर आर्थिक संकट ओढावले आहे.या घडलेल्या घटनेमुळे बाकीचे शेतकरी हैराण व भयभीत झाले आहे. तरी या घटनेचा महसूल व पोलीस प्रशासनाने तात्काळ घटनेचा पंचनामा करून आरोपीला शोधून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला आर्थिक नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे. या घटनेची माहिती मिळतात विट अमलदार गणेश देडे यांनी पंचासमक्ष पंचनामा करून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून घेतला आहे.या घटनेचा पुढील तपास अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बिट अमलदार गणेश देडे करीत आहे.

**जळक्या प्रवृत्तीच्या आरोपीवर कडक कारवाई करा**

# वाहुली येथील सामाजिक संस्थेच्या कार्यालयाचे खासदार सुरेश म्हात्रे यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी, मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गालगत असलेल्या वाहुली येथील एका सामाजिक संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले.

वाहुली परिसरात सामाजिक उपक्रम राबवित असलेल्या वाहुली गाव विकास प्रतिष्ठान या नोंदणीकृत संस्थेच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खासदार म्हात्रे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.


यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुरेश शिंदे, उपाध्यक्ष यशवंत ठाणगे, समाजसेवक योगेश गायकर, पडघा सोसायटीचे सभापती गुरूनाथ मते, सुभाष बरफ, प्रभाकर जाधव, गणेश मते, शांताराम पाटील, विवेक ठाणगे, जितेंद्र ठाणगे, अल्पेश जाधव राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष गणेश गुळवी, उबाठा शिवसेना भिवंडी ग्रामीण विधानसभा संपर्क संघटक हनुमान पाटील, मनसेचे शैलेश बिडवी, नरेश शेलार, भास्कर माळी, एकनाथ पाटील रोहीदास सुतार पोलीस पाटील दिलीप धनगर, समीर ठाणगे, मनोज ठाणगे, विश्वास ठाणगे, मिलिंद जाधव, उमेश ठाणगे, विरेंद्र शिंदे, सुरेश ठाणगे, शेखर ठाणगे नवनाथ सोनावणे, मिथुन ठाणगे, रमेश मुकणे, लक्ष्मण जाधव, भरत जाधव, प्रकाश ठाणगे, सतीश भोईर, सुमीत भोईर, रोहीदास भांबरे, संगीता शिंदे, वर्षा ठाणगे, रुपाली



सोनावळे, आशा जाधव, उर्मिला भांबरे, सह येथील तरुण, महीला, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन गणेश गायकवाड यांनी केले.

# अंत्री खेडेकर हे प्रेरणादायी भूमी : डॉ. सत्येंद्र भुसारी

## संघर्ष केल्यामुळे यश मिळते : डॉ. ज्योतीताई खेडेकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा/जिल्हा प्रतिनिधी, राहुल साबळे : चिखली तालुक्यातील अंत्रीखेडेकर येथे २१ ऑक्टोबर २०२४ रोजी अंत्री खेडेकर येथील मारुती मंदिर मध्ये अंत्री खेडेकर येथील भक्ती महामार्ग बादित शेतकरी यांनी भक्ती महामार्ग रद्द होण्यासाठी ज्यांनी मार्गदर्शन केले होते असे डॉक्टर सत्येंद्र भुसारी डॉक्टर ज्योतीताई खेडेकर तसेच समाधान मस्के हे आज अंत्री खेडेकर येथे आले होते त्यावेळेस अंत्रीखेडेकर येथील भक्ती महामार्ग बाबतीत शेतकरी यांनी डॉक्टर सत्येंद्र भुसारी डॉक्टर ज्योतीताई खेडेकर समाधान मस्के यांचा एकत्रित सत्कार केला.

त्यावेळी डॉक्टर सत्येंद्र भुसारी हे बोलत असताना त्यांनी सांगितले की अंत्री खेडेकर ही प्रेरणादायी भूमी आहे भक्ती महामार्ग बंद करण्याचे सुरुवात याच गावापासून झाली होती हीच ठिणगी पूर्ण देळगाव राजा तालुका चिखली तालुका व खामगाव तालुका मध्ये पेटत राहिली त्यामुळे भक्ती महामार्ग हा सरकारला अखेर बंद करावा लागला याचे पूर्ण श्रेय हे अंत्री खेडेकर येथील भक्ती महामार्ग बादित शेतकरी यांना जात आहे.

तर या वेळी भक्ती महामार्ग होऊ नये यासाठी शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन डॉ ज्योतीताई खेडेकर यांनी केले होते त्यांनी अंत्री खेडेकर येथील भक्ती महामार्ग बादित शेतकरी यांना सांगितले की कोणत्याही काम आवघड नसते संघर्ष केला तर यश हे हमखास मिळते याचे उदाहरण म्हणजे अंत्रीखेडेकर येथील भक्ति महामार्ग विरोधी समिती यांनी संघर्ष केला याची प्रेरणा देवळगाव राजा तालुका चिखली तालुका व खामगाव तालुका येथील शेतकरी यांनी घेवून भक्ती महामार्ग सरकारला बंद पाडण्यासाठी भाग पाडले अंत्रीखेडेकर हि संघर्ष करणारी भुमी आहे या वेळी अंत्रीखेडेकर येथील भक्ती महामार्ग विरोधी समिती मधील भरपूर शेतकरी या वेळी हजर होते.

**डॉ. दीपक वाकुडकर, सर्प व प्राणी मित्र प्रदिप पट्टेबहादूर आणि विष्णू पायघन यांच्या प्रयत्नाला यश**

**डॉ. दीपक वाकुडकर यांची माहिती**

# डॉक्टर व प्राणीसर्प मित्र यांच्या प्रयत्नातून वाचले काळवीटाच्या पीलाचे प्राण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिम : येथून जवळच असलेल्या केकतउमरा - वेळेगावं शेतशिवारामध्ये शेतकरी डॉ. दीपक वाकुडकर यांच्या शेतामध्ये एका हरण - काळवीटाच्या पिल्लाला शॉन कुत्र्यांनी चावा घेऊन जखमी केल्याचे दिसून आले.

सदर माहिती ही डॉ. दीपक वाकुडकर यांनी प्राणी व सर्पमित्र पर्यावरण प्रेमी प्रदिप पट्टेबहादूर यांना फोन द्वोरे दिली. त्यांनी अवघ्या काही क्षणामध्ये सविस्तर माहिती ही वनविभागाला देऊन आपले केकतउमरा येथील साथी सर्प व प्राणीमित्र विष्णू पायघन यांना घटनास्थळी पाठविले यावेळी सर्प मित्र विष्णू पायघन यांनी या काळवीटाच्या पिलाला ताब्यात घेऊन त्याची पाहणी केली तर त्याला शॉन कुत्र्यांनी अनेक ठिकाणी चावा घेतल्याचे निर्देशनात आले. यावेळी डॉ. दीपक वाकुडकर वैद्यकीय सेवा देत त्यांनी माणुसकीचा धर्म जोपासत आपली सेवा आणि उपचारातून या काळवीटाच्या पीलाचे प्राण वाचविले आणि त्यांनी उपचार देखील त्यावरती केला. यावेळी सर्पमित्र विष्णू पायघन सामाजिक कार्यकर्ते अभिषेक काकडे, यांनी गाडीमध्ये टाकून या काळविटाला गावामध्ये आणले यावेळी प्रदीप पट्टेबहादूर यांनी वनविभागाला संपर्क करून सविस्तर माहिती देऊन यावेळी या काळविटाच्या पिलाला वनविभाग कर्मचारी आर.फ.ओ हरिष तायडे आणि आर.फ.ओ प्रमोद भगत यांच्या ताब्यामध्ये देण्यात आले.पुढील उपचारा वन विभागामार्फत या काळविटाच्या पिलावर केला जाणार असल्याची माहिती

**स्नेक रेस्क्यू रेवोल्युशन फाउंडेशन पुणे वाशिम जिल्हा टीम व राजा प्रसेनजित संस्था केकतउमरा यांची धडाकेबाज कारवाई**

**पंधरा दिवसांमध्ये दिले एक वानर, दोन काळवीट पिल्लू, तीन बीन विषारी धामण जातीचे साप, दोन अति विषारी भारतीय नाग, एक विषारी घोणस, दोन मन्यार जातीच्या सापाला व प्राण्याला जीवनदान.**

**आपल्या परिसरात जर कुठला साप अथवा प्राणी पक्षी हा संकट व्यवस्थेमध्ये आढळून आला. तर सर्प व प्राणी मित्र आणि वनविभाग यांच्याशी संपर्क साधावा आम्ही त्याचे प्राण वाचवू जमिनीवरील प्रत्येक घटक जीव साप प्राणी हे जीवनसृष्टीतील पर्यावरणासाठी एक महत्त्वाचे घटक आहे.**

**सर्प व प्राणी मित्र - प्रदिप पट्टेबहादुर व विष्णू पायघन - केकतउमरा वाशिम**

**वन्यजीवचे अनेक प्रकारे महत्वाचे असून त्यांचे जीवन हे पर्यावरणसाठी महत्त्वपूर्ण आहे. वन्य प्राणी पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करतात.वन्यजीवांचे संवर्धन जैवविविधता टिकवून ठेवण्यास मदत करते. वन्य प्राण्यांचे संवर्धन केल्याने आपले वातावरण स्वच्छ आणि निरोगी होण्यास मदत होते. वन्यजीवांचे संवर्धन हा आपल्या संस्कृतीचा आणि वारशाचा अविभाज्य भाग आहे.त्यामुळे आपल्या भागात कुठलाही प्राणी साप आढळला तर त्याला हानी न पोहवचता त्याची माहिती वनविभागाला अथवा प्राणी व सर्पमित्रांना दिली द्या.**

**वनपरिक्षेत्र अधिकारी,(प्रा) कार्यालय - वन विभाग वाशिम**



यावेळी - स्नेक रेस्क्यू रेवोल्युशन फाउंडेशन पुणे वाशिम जिल्हा टीम व राजा प्रसेनजित संस्था केकतउमरा सर्प व प्राणी मित्र प्रदीप पट्टेबहादूर,विष्णू पयघान यांनी दिली.